**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कडेगांव यांच्या न्यायालयात,**
**ता.कडेगांव, जिल्हा सांगली.**

**नियमीत दिवाणी दावा क्र.२२८/२०१९**

**कमल अंकुश पवार वगैरे ...... वादी**

**विरुध्द**

**महादेव पांडूरंग पवार वगैरे ...... प्रतिवादी**

## निशाणी ५८ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ चे कलम ६३ अन्वये दाखल केला असुन अर्जातील कथने थोडक्यात खालील प्रमाणे -

वादीने असे कथन केले की, दावा मिळकतीबाबतचे दिनांक १६/०६/१९८१ व दिनांक १७/०५/१९८४ रोजीचे गहाण स्वरुपी मुदत खरेदीपत्राचे दस्त असून त्यापैकी दिनांक १६/०६/१९८१ चा मुळ दस्त प्रतिवादी क्र.६-अ ते ६-ड व दिनांक १७/०५/१९८४ चा मुळ दस्त प्रतिवादी क्र.५-अ ते ५- ई यांच्या ताब्यात आहे. ते मुळ दसत प्रतिवादींनी दाव्याचे कामी दाखल केले नाहीत. वादीने त्या दस्तांची सहीसुद प्रत दाखल केली असून त्याला दुय्यम पुरावा समजण्यात यावे अशी वादीने विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल न केल्याने त्याच्या विरुध्द

'विना म्हणणे' आदेश पारीत करणेत आला आहे.

३. वादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज दुय्यम पुरावा दाखल करणेकरीता परवानगी मिळणेबाबत असलेने भारतीय पुरावा कायदा कलम ६५ मधील तरतुदींचे अवलोकन करणे योग्य ठरते. प्रस्तुत अर्जातील कथने विचारात घेता, प्रस्तुत अर्जास भारतीय पुरावा कायदा कलम ६५(अ) मधील तरतुदी लागु होतात. भारतीय पुरावा कायदा कलम ६५(अ) मधील तरतुदीनुसार मुळ कागदपत्र अशा व्यक्तीच्या ताब्यात आहेत ज्या व्यक्तीविरुध्द ते कागदपत्र शाबीत करायचे आहेत, अशा परिस्थितीत त्या व्यक्तीस भारतीय पुरावा कायदा कलम ६६ अन्वये नोटीस दिल्यानंतर देखील ती व्यक्ती ते कागदपत्र न्यायालयात दाखल करत नसेल तर त्या कागदपत्राचा दुय्यम पुरावा देता येतो.

५. प्रस्तुत दाव्यात वादीने प्रतिवादींना गहाणाचे दस्त दाखल करणेबाबत निशाणी ४२ येथे अर्ज दिला होता. त्या अर्जाचे कामी प्रतिवादींना नोटीस काढली असून ती नोटीस प्रतिवादी क्र.५-ब ते ५-ई यांना बजावणी झाली असून तसा अहवाल निशाणी ४९ येथे दाखल आहे. प्रतिवादी क्र.६-अ ते ६-ड यांना नोटीस बजावणी झाली असून तसा अहवाल निशाणी ५४ येथे दाखल आहे. तसेच प्रतिवादी क्र.५-अ मयत आहे. प्रतिवादींना नोटीसची बजावणी होवून देखील त्यांनी मुळ दस्त दाखल केले नाहीत अगर ते दस्त त्यांच्या ताब्यात नाहीत असे देखील न्यायालयासमोर येवून

सांगितलेले नाही. यावरुन ते दस्त प्रतिवादींच्याच ताब्यात आहेत हे स्पष्ट होते. प्रतिवादींना नोटीस देवून ही त्यांनी दस्त दाखल न केलयाने वादीस दिनांक १७/०५/१९८४ व १६/०६/१९८१ रोजीच्या दस्तांचा दुय्यम पुरावा देण्याची संधी देण्यात येते. म्हणुन मी खालील आदेश पारीत करते.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादीने निशाणी ३८/२ व ३ सोबत दाखल केलेल्या १७/०५/१९८४ व १६/०६/१९८१ रोजीच्या दस्तांस दुय्यम पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येते.

३. सदरचे दस्त शाबीत करणेची जबाबदारी वादीची राहिल.

स्वाक्षरी/-xxx

कडेगांव

**(प्राजक्ता रा. सबनीस)**

दिनांक : ०९/११/२०२३

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कडेगांव